# सहसंचालक तंत्रशिक्षण

विभागीय कार्यालय, गाडगेनगर, अमरावती ४४४ ६०३

दुरध्वनी ०७२१ २५७३०२७ (का.)
०७२१ २५७२५७७ (नि.)
फॅक्स ०७२१ २५७७९१३

संकेतस्थळ : www.jdroamt.org.in
ई-मेल: roamravati.dte@gmail.com

जा क्र विकाअ/लले/तक्रार-चौकशी/२०१६/११८ दि. - 8 FEB 2017

**परिपत्रक**

प्रती
प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानीत
तंत्रशिक्षण संस्था,
अमरावती विभाग

विषय : संस्थास्तरावर तक्रार निवारण होण्याचे हेतूने विविध समित्यांची स्थापना करणेबाबत.
संदर्भ : संचालनालयाचे पत्र जा क्र १०/एनजीपी/तक्रार-समिती/२०१७/३०१७, दि. १३.१.२०१७.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भांकित पत्रात कळविल्याप्रमाणे संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, संचालनालयाच्या अखत्यारीतील विविध तंत्रशिक्षण संस्थांमध्ये कार्यरत कर्मचारी, शिक्षण घेत असलेले विद्यार्थी किंवा त्यांचे पालक इ. हयांचेमार्फत थेट संचालनालयास तक्रारी सादर केल्या जातात. प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संचालनालयास विभागीय कार्यालयास हया प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात येते अथवा समिती नेमून चौकशी करण्याबाबत सूचीत करण्यात येते अथवा संबंधित संस्थेकडून अहवाल मागविण्यात येतो व त्यावर पुढील कार्यवाही करणे शक्य होते.

हयाबाबत असे कळविण्यात येते की, संचालनालयाच्या अखत्यारीतील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये कार्यरत कर्मचारी, शिक्षण घेत असलेले विद्यार्थी किंवा त्यांचे पालक इ. हयांचेमार्फत प्राप्त तक्रारींची संस्थास्तरावर निराकरण होणे आवश्यक आहे. हयाकरीता सर्व संस्थांमध्ये अँटी रॅगींग समिती, महिला तक्रार निवारण समिती, विद्यार्थी तक्रार निवारण समिती, कर्मचारी तक्रार निवारण समिती इ. समित्यांची तात्काळ स्थापना करण्यात यावी तसेच सदर समिती स्थापन करण्यात आल्याबाबत संस्थेतील दर्शनी भागावर समिती व समिती संपर्क हयाबाबत पत्रके लावून सदर बाब सर्व संबंधितांचे निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच संबंधितांनी तक्रारींबाबत संबंधित समितीशी संपर्क करावा अशा सूचना देण्यात याव्यात.

उपरोक्त प्रमाणे स्थापित समितीस संस्थांनी समितीच्या कार्यवाहीसाठी व तक्रार निवारण संस्थास्तरावर होण्याचे दृष्टीने संपूर्ण सहकार्य करावे. पुढे असेही नमूद करण्यात येते की, संचालनालयास तक्रारी प्राप्त झाल्यास हयाबाबत संस्थास्तरावरील समितीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व समितीचे अभिप्राय पुढील कार्यवाहीसाठी संचालनालयस्तरावर विचारात घेतले जातील. संबंधित तक्रारींच्या अनुषंगाने संस्थांनी संस्थास्तरावरील समितीचा अहवाल व अभिप्राय संबंधित चौकशी समितीस अथवा संचालनालयास सादर न केल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील याची सर्व संबंधित तंत्रशिक्षण संस्थांनी नोंद घ्यावी.

(डी एन शिंगाडे)
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
वि.का.अमरावती

प्रत :

प्रक्रिया योजक (संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी).